# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.02.2026** **वारःगुरुवार**

---

1. दुर्मिळ खनिजांसाठीच्या FORGE उपक्रमाला भारताचा पाठिंबा-परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर अमेरिकेतील परिषदेत माहिती
2. भारत टॅक्सी सेवेचा आजपासून शुभारंभ होणार
3. रशिया-युक्रेन संघर्षविरामासंदर्भात अमेरिकेच्या मध्यस्थीने बैठक आणि
4. 19 वर्षांखालील युवकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारतानं काल अफगाणिस्तानला नमवून अंतिम फेरीत प्रवेश

**एस जयशकर**

दुर्मिळ खनिज संपत्तीची साठवणूक आणि पुरवठा साखळीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील श्रृंखला जोखीम-विरहित करणं आवश्यक असल्याचं महत्त्व परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल अधोरेखित केलं. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्या उपस्थितीत काल वॉशिंग्टन डीसी इथं आयोजित क्रिटिकल मिनरल्स मंत्रीस्तरीय बैठकीला ते संबोधित करत होते. दुर्मिळ खनिजांसाठीच्या FORGE उपक्रमाला भारताचा पाठिंबा असल्याचं यावेळी बोलताना जयशंकर यांनी सांगितलं. ही माहिती त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे. दुर्मिळ खनिजांसाठी भारताद्वारे राबवण्यात येणारं राष्ट्रीय स्तरावरील अभियान, खनिजांबाबत काम करण्यासाठी उभारण्यात आलेले कॉरिडॉर, निधीची उपलब्धता आणि गुतंवणूक यासारख्या उपक्रमांद्वारे अधिक सक्षमपणे प्रयत्न केले जात असल्याची माहिती त्यांनी आपल्या भाषणातून दिली. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे.डी. व्हान्स यांनी जागतिक स्तरावर दुर्मिळ खनिजांच्या बाजारपेठेला आकार देण्यासाठी सहकार्यासंदर्भात काम करण्याच्या उद्देशाने ही पहिली बैठक आयोजित केली आहे.

या बैठकीपूर्वी, डॉ. जयशंकर यांनी कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद आणि सिंगापूरचे व्हिव्हियन बालकृष्णन यांच्यासह नेदरलँड्स, इटली, मलेशिया, बहरीन, मंगोलिया, पोलंड, रोमानिया, इस्रायल आणि उझबेकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांची भेट घेतली.

**अमित-शाह**

ॲप-आधारित वाहन सेवा देणारी सुविधा 'भारत टॅक्सी' चं उद्घाटन केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत होणार आहे. हा भारताचा पहिला सहकारी-आधारित राईड-हेलिंग प्लॅटफॉर्म आहे. अशी माहिती सहकार मंत्रालयानं काल दिली. भारत टॅक्सीची संकल्पना दळणवळण क्षेत्रातील एक परिवर्तनकारी उपक्रम ठरेल, सेवा देणाऱ्या चालकाला सारथी या नावाने संबोधले जाईल आणि सारथी हाच मालक या संकल्पनेवर आधारित परिचालन आणि मूल्य निर्मितीच्या केंद्रस्थानी असेल. याद्वारे 'बाईक दीदी' सारखे उपक्रम राबवले जात असून आतापर्यंत दीडशेहून अधिक महिला चालक भारत टॅक्सीमध्ये सहभागी झाल्या आहेत.

**दौरा-अमित-शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून जम्मू आणि काश्मीरच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित यंत्रणांबरोबर आढावा बैठक घेतील, विकास प्रकल्पांचे मूल्यांकन करतील आणि राजकीय स्तरावरील नेत्यांशी संवाद साधतील. उद्या सकाळी कठुआ जिल्ह्यातील हिरानगर भागातील आंतरराष्ट्रीय सीमेलाही ते भेट देतील आणि सीमेपलीकडून होणारी घुसखोरी रोखण्यासाठी सीमा सुरक्षा दलाकडून बसवण्यात आलेल्या नवीन उपकरणांची पाहणी करतील.

**जम्मू काश्मीर**

जम्मू काश्मीरच्या कीश्तवाड जिल्ह्यात सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत एक दहशतवादी मारला गेला. या भागात संशयित दहशतवादी लपले असल्याच्या माहितीवरून शोध मोहीम सुरू होती. त्यावेळी दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केल्यानंतर सुरक्षा दलांनी दिलेल्या प्रत्युत्तरात एक दहशतवादी मारला गेला.

तर जैश-ए-मोहम्मद संघटनेच्या एका कमांडरसह दोन पाकिस्तानी दहशतवादी काल उधमपूर जिल्ह्यात मारले गेले अशी माहिती आकाशवाणीच्या प्रतिनिधींनी दिली.

**संसद**

भारत-अमेरिका व्यापार करारात देशातल्या कृषी आणि खतं या क्षेत्रांबद्दलची संवेदनशीलता लक्षात घेऊन ती संरक्षित राहतील, याची काळजी घेण्यात आली आहे, असं ठाम प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी काल संसदेत केलं. भारत-अमेरिका व्यापार कराराविषयी त्यांनी निवेदन केलं. या करारात भारतानं आपल्याला महत्वाच्या क्षेत्रांमध्ये हित साधलं आहे, असं गोयल म्हणाले.

राज्यसभेत काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावरची चर्चा पुढे सुरु राहिली. केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी देशाच्या विकासाचा आढावा घेतला, तर वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांनी भारत-अमेरिका व्यापार कराराबद्दल सभागृहाला माहिती दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या काळात देशात सामाजिक न्याय आणि सौहार्द लयाला गेल्याचा आरोप राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केला.

**RBI-पतधोरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक काल सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली सहा सदस्यांची पत आणि वित्त धोरण समिती उद्या पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करतील.

**पंतप्रधान-मलेशिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी 7 आणि 8 फेब्रुवारी दरम्यान मलेशियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या आमंत्रणावरून हा दौरा होणार आहे. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी मलेशियाच्या पंतप्रधानांशी द्विपक्षीय चर्चा करणार असून सहकार्य वृद्धीसाठी विविध उद्योगांच्या प्रतिनिधींशी बैठका घेतील.

**रशिया-युक्रेन-पूल-मंजुषा**

युक्रेन आणि रशिया यांच्यातील संघर्षविरामासंदर्भात वाटाघाटी करण्याच्या उद्देशाने काल अबू धाबीमध्ये अमेरिकेच्या मध्यस्थीने आयोजित केलेल्या चर्चेची दुसरी फेरी सुरू झाली, या दोन दिवसाच्या त्रिपक्षीय बैठकीत युक्रेन, रशिया आणि अमेरिकेचे अधिकारी सहभागी झाले आहेत. युक्रेनियन शिष्टमंडळाचे नेतृत्व युक्रेन संरक्षण परिषदेचे सचिव रुस्तम उमेरोव्ह, रशियन शिष्टमंडळाचे नेतृत्व लष्करी गुप्तचर प्रमुख इगोर कोस्त्युकोव्ह, अमेरिकेचे स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांच्यासह इतर प्रतिनिधी चर्चेत सहभागी झाले आहेत.

**निवडणूक-आयोग**

भारतीय निवडणूक आयोगाने 25 आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या संदर्भात, पश्चिम बंगाल सरकारने केलेली सूट देण्याची विनंती फेटाळली आहे. पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी येथील आगामी विधानसभा निवडणुकीत निरीक्षक म्हणून नियुक्तीसाठी त्यांना आज आणि उद्या नवी दिल्लीत माहिती देण्यासाठी बोलावण्यात आले आहे.

यापूर्वी निरीक्षक म्हणून नियुक्तीसाठीसंदर्भात अधिकाऱ्यांची यादी पाठवण्याबाबत निवडणूक आयोगाने अनेकदा राज्य सरकारकडे विनंती केली आहे. मात्र त्याला प्रतिसाद न मिळाल्याने आयोगाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. पश्चिम बंगालचे गृह सचिव जगदीश प्रसाद मीना यांच्यासह वरिष्ठ आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांची यादी निवडणूक आयोगाने तयार केली आहे.

**गोवा-पुस्तक जत्रा**

गोवा पुस्तक महोत्सवाला काल पणजीमध्ये सुरवात झाली. साहित्य आणि संस्कृती यांचा अनोखा संगम असलेल्या या महोत्सवाचं उद्घाटन मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते झालं. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात 200 हून अधिक प्रकाशक इंग्रजी, कोकणी, मराठी आणि हिंदी भाषेतली पुस्तकं घेऊन दाखल झाले आहेत.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ओडिशातील मयूरभंजच्या दौऱ्यावर आहेत. आज त्या सिमलीपाल व्याघ्र प्रकल्पाला भेट देणार आहेत. राज्याच्या सहा दिवसांच्या दौऱ्याच्या पाचव्या दिवशी, आज सकाळी रायंगपूर इथं श्री जगन्नाथ मंदिरात त्या पूजा-अर्चना करतील. तसंच त्यांचे मूळ गाव असलेल्या पहाडपूरला आज त्या भेट देणार आहेत. राखीव क्षेत्रामधील आदिवासी महिला आणि युवक गटांशीही संवाद साधणार आहेत.

**नेपाळ**

नेपाळने पुढील महिन्यात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याच्या उद्देशाने देशभरात हजारो लष्करी जवान तैनात करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या वर्षीच्या 'जनरेशन झेड' आंदोलनानंतर होणाऱ्या या पहिल्याच निवडणुका आहेत, या आंदोलनामुळे के. पी. शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार कोसळले होते. अशी माहिती नेपाळ लष्कराच्या प्रवक्त्याने दिली आहे. राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी 5 मार्च रोजी होणाऱ्या प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकांसाठी लष्कर तैनात करण्याच्या सरकारच्या शिफारशीला मंजुरी दिली होती. निवडणूक सुरक्षेच्या उद्देशाने देशभरात सुमारे साडेतीन लाखापेक्षा अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात केले जातील, यामध्ये 80 हजार लष्करी जवानांचा समावेश आहे. हे सुरक्षा कर्मचारी 165 मतदारसंघांमध्ये पसरलेल्या एकंदर 10 हजार 800 मतदान केंद्रे आणि 23 हजारपेक्षा अधिक मतदान बूथवर तैनात करण्यात येणार आहे.

**प्लास्टइंडिया**

'प्लास्टइंडिया 2026' हे प्रदर्शन आजपासून नवी दिल्लीत सुरू होत आहे. रसायन आणि खते मंत्रालयाच्या वतीनं शून्य कचरा संकल्पनेवर आधारित हे प्रदर्शनांत हजारांहून अधिक आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणारे उद्योजक,यंत्रसामग्री, कच्चा माल आणि या क्षेत्रातीलपरस्पर आधारित अर्थव्यवस्था, नवनवीन अत्याधुनिक नवकल्पना आदी मुद्यांबाबत सादरीकरण करतील. तसंच व्यापार, तंत्रज्ञान, प्रतिभा आणि पर्यटन या धोरणात्मक भागीदारी याबाबत चर्चा अपेक्षित आहे.

**क्रिकेट**

19 वर्षांखालील युवकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारतानं काल अफगाणिस्तानला नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला. झिम्बाब्वेमधल्या हरारे इथं झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात सामन्यात अफगाणिस्ताननं ठेवलेलं 310 धावांचं आव्हान भारतानं 3 गड्यांच्या मोबदल्यात सहज पार केलं. आरॉन जॉर्जनं 115 तर वैभव सूर्यवंशीनं 68 धावा फटकावल्या.
अंतिम फेरीत भारताचा सामना शुक्रवारी इंग्लंडशी होणार आहे. भारतानं या पूर्वी पाच वेळा युवा क्रिकेटचं जगज्जेतेपद पटकावलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.